सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.**
दूरध्वनी क्र ०२०-२६१३६८४५ फॅक्सक्र. ०२०-२६१११५९० ईमेल-commissioner.disability@maharashtra.gov.in

---

जा.क्र./दिकआ/प्र-सर्व/हस्तांतर-स्थलांतर./जाहिरात/मुदतवाढ/२०२४-२५/901 पुणे, दिनांक - ~~.०९.२०२४~~ 27/09/2024

## जाहिरात मुदतवाढ

प्रति,

१) सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, **मुंबई शहर/उपनगर.**

२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, **सर्व.**

**विषय :- दि.१६.०९.२०१७ व शासन निर्णय शुद्धिपत्रक दि.१५.०२.२०१९ मधील धोरणानुसार बंद पडलेल्या अनुदानित विशेष शाळा, प्रशिक्षण केंद्र व अनाथ मतिमंद बालगृहाचे हस्तांतर व स्थलांतर करणेबाबतच्या जाहिरातीस अनुसरुन स्वयंसेवी संस्थेकडून अर्ज मागविणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ :-
१. शासन निर्णय दि.१६.०९.२०१७ व शासन निर्णय शुद्धिपत्रक दि.१५.०२.२०१९.
२. शासनाचे पत्र क्र. इडीडी-२०२२/ प्र. क्र.१५१/दि. क-१, दि. १६.०७.२०२४.
३. शासनाचे पत्र क्र. इडीडी-२०२२/ प्र. क्र.१५१/दि. क-१, दि. २९.०८.२०२४.
४. या आयुक्तालयाचे पत्र क्र. ८५९ दिनांक १२.०९.२०२४.
५. या आयुक्तालयाचे पत्र क्र. ८६० दिनांक १२.०९.२०२४.

यापूर्वी प्रसिध्द झालेली जाहिरात क्र. Dgipr No. २०२४-२५/क्र.५/C-२९४२ दि. १४.०९.२०२४ नुसार आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिव्यांग कल्याण विभागांतर्गत दिव्यांगांच्या अनुदानित बंद पडलेल्या / मान्यता रदद केलेल्या अनुदानित विशेष शाळा / कार्यशाळा हस्तांतर व स्थलांतर करणेकरिता इच्छुक पंजीकृत स्वंयसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्याची मुदत दिनांक ३०.०९.२०२४ अखेर पर्यंत देण्यात आलेली आहे. सदरहू जाहिरातीस अनुलक्षुन इच्छुक पंजीकृत स्वंयसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यासाठी **दिनांक १०.१०.२०२४** अखेर कार्यालयीन वेळेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.याबाबतच्या सुचना आपल्या कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी.

तसेच उक्त नमुद केलेल्या जाहिरातीमधील विहीत अर्जाचा नमुना, इतर सर्व अटी- शर्ती कायम आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

**सुचना:-**

१. विहीत अर्जाचा नमुना, अटी व शर्ती, अर्जाच्या सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी इ. माहिती दिव्यांग कल्याण विभागाच्या वेब साईट https://divyangkalyan.maharashtra.gov.in वर तसेच सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर / उपनगर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व यांचे कार्यालयात **दि. १०.१०.२०२४ अखेर** कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर / उपनगर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व यांचे कार्यालयाकडे अर्जदार संस्थेने परिपूर्ण अर्ज सादर करण्याचा सुधारित **अंतिम दिनांक १०.१०.२०२४** असा आहे.

३. तसेच आपणाकडे इच्छुक संस्थांचे विहीत मुदतीत प्राप्त झालेले परिपूर्ण अर्ज संकलित करुन सदर अर्जाची छानणी व पडताळणी करुन राज्यस्तरीय समितीकडे सर्व अर्ज / प्रस्ताव सादर करण्याच्या दृष्टीने **दिनांक १५.१०.२०२४** अखेर कार्यालयीन वेळेपर्यंत सर्व प्रस्ताव आयुक्तालयास हस्ते पोहोच करण्याची दक्षता घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत अर्ज मुदतीनंतर स्विकारू नये व ते आयुक्तालयास सादर करू नये, जाहीरातीतील वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे. मुदतबाहय प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

**(प्रवीण पुरी, भा.प्र.से.)**
**आयुक्त, दिव्यांग कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**